# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि—४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ ( १९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११रोजी स्थापित राज्य विद्यापीठ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

परिक्षा व मुल्यमापण मंडळ

फोन:— ०७१३२.२२३३५० Email :- confidential.section@unigug.ac.in

गोवि/गोपनिय/जा.क्र./१०९७/२०२६ दिनांक: १६/०५/२०२६

## परिपत्रक

**विषय :- उन्हाळी परीक्षा २०२६ च्या अनुषंगाने Onscreen मुल्यांकनाचे कार्याकरीता महाविद्यालयातील प्राध्यापकांनी मुल्यांकन केंद्रावर उपस्थित राहणेबाबत.**

**संदर्भ :-** मा. प्र.- कुलगुरू, महोदयांची मान्यतेची नस्ती दिनांक १३/०५/२०२६

उपरोक्त विषयान्वये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांना सुचित करण्यात येते की, उन्हाळी परीक्षा-२०२६ च्या परीक्षेच्या अनुषंगाने Onscreen मुल्यांकनाचे कार्य चालु झालेले असुन महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक Onscreen मुल्यांकनाकरीता उपस्थित राहात नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे Onscreen मुल्यांकनाचे कार्य प्रभावित होत आहे.

Onscreen मुल्यांकन केद्राकडून मुल्यांकनाचे पत्र प्राध्यापकांना पाठविण्यात आलेले आहे. परंतु आपणास ई-मेल द्वारे पत्र प्राप्त झाले नसेल तरीही प्राध्यापकांनी आपले कार्यक्षेत्राजवळील Onscreen मुल्यांकन केंद्राशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून तातडीने उपस्थित होऊन मुल्यांकनाचे कार्य विहीत कालावधीमध्ये पार पाडणेबाबत या परिपत्रकाद्वारे आदेशीत करण्यात येत आहे. आपणास Onscreen मुल्यांकन केंद्रावर Login Id व Password उपलब्ध करून दिल्या जाईल.

**मुल्यांकनाचे कार्याकरीता अनुपस्थित प्राध्यापकांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील ४८/४ व ४८/५ (क) नुसार कार्यवाही घेण्यात येईल संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

तसेच **संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आपले अधिनस्त प्राध्यापकांना तसेच संदर्भिय नस्तीला अनुसरून मा. प्र-कुलगुरू, महोदयांनी दिलेल्या मान्यतेनुसार महाविद्यालयातील दोन वर्ष CHB प्राध्यापक म्हणुन कार्य केलेल्या प्राध्यापकांना सुध्दा मुल्यांकनाकरीता Onscreen मुल्यांकन केंद्रावर उपस्थित होण्याबाबत आपले स्तरावरून आदेशीत करावे.**

**(सीए भास्कर पठारे)**
संचालक (प्रभारी)
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**मुल्यांकन केंद्र, पदनाम व संपर्क क्रमांक**

| **मुल्यांकन केंद्र** | मुल्यांकन केंद्राधिकारी यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक | सहमुल्यांकन केंद्राधिकारी यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| **गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली** | डॉ. नंदकिशोर मेश्राम मो.नं. ९९७००३२७८५ | डॉ. क्रिष्णा कारू मो.नं.९४२३४०३१९३/७७५७९६४३२२ |
| **सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर** | डॉ. प्रकाश बोरकर मो.नं. ९४२१५७८३२३ | - |
| **नेवजाबाई हितकारीणी महाविद्यालय, ब्रम्हपूरी** | डॉ. आशिष साखरकर मो.नं. ९१५८९५३२१० | - |

**प्रतिलीपी :-**

१) मा. कुलगुरू, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. प्र.- कुलगुरू, यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली